अवघे धरु सुपंथ

# पंचगंगा बँक

श्री पंचगंगा नागरी सहकारी बँक लि., कोल्हापूर

**मुख्य कार्यालय :** टी.पी. स्कीम नं. ३,
फायनल प्लॉट नं. १६, प्रतिभानगर, कोल्हापूर.
फोन : ०२३१-२६९१३२९, २६९३५१७

# वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस
## (फक्त सभासदांकरीता)

**श्री पंचगंगा नागरी सहकारी बँक लि., कोल्हापूर** या बँकेच्या सर्व सभासदांना कळविणेत येते की सन २०२२-२३ सालची ५२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार दि. १५/०७/२०२३ रोजी दुपारी ठीक ४.०० वा. व्ही. टी. पाटील सभागृह, ताराराणी विद्यापीठ, कमला कॉलेज, टाकाळा, कोल्हापूर** येथे खालील विषयांबाबत विचार करणेकरिता भरविणेत येणार आहे. तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे हि विनंती.

## * सभेपुढील विषय *

१. दि १६/०७/२०२२ च्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. दि ३१/३/२०२३ इ. रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, कॅश फ्लो स्टेटमेंट व अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चासह मंजूर करणे.
३. सन २०२२-२३ सालचे नफा विभागणीस मंजुरी देणे.
४. सन २०२३-२४ सालचे अंदाजपत्रक मंजूर करणे.
५. सन २०२१-२२ च्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या अहवालाच्या दोष दुरुस्तीची नोंद घेणे.
६. सन २०२२-२३ या वर्षाच्या वैधानिक लेखापरीक्षक मे. किरण दामले अँन्ड कंपनी, चिपळूण यांच्या लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे.
७. संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईक यांच्या कर्जाच्या माहितीची नोंद घेणे.
८. सन २०२३-२४ करीता वैधानिक लेखापरीक्षक नेमणुकीबाबत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेणे व अनुषंगीक कार्यवाही करणे.
९. सन २०२४-२५ वर्षासाठी अंतर्गत लेखापरीक्षक व आवर्ती लेखापरीक्षक यांची नियुक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
१०. एक रक्कमी कर्ज परतफेड (O.T.S.) योजनेमध्ये समाविष्ट केलेल्या कर्ज खात्यांची माहिती अवलोकन करून त्यास मंजुरी देणे.
११. पोटनियम दुरुस्ती प्रस्तावास मंजुरी देणे. (पोटनियम दुरुस्ती प्रस्ताव नोटीस बोर्डावर लावण्यात आलेला आहे.)
१२. सदर वर्षात सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांच्या अनुपस्थितीस / रजेस परवानगी देणे.
१३. मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार करणे.

मा. संचालक मंडळाचे आदेशावरून

कोल्हापूर
तारीख : ३०/०६/२०२३

**दीपक फडणीस**
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

---

**टीप - सदर सभा कोरमअभावी तहकूब झालेस ही सभा अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी त्याच दिवशी घेणेत येईल. अशा सभेस आवश्यक गणपूर्तीचे बंधन राहणार नाही.**

**सूचना**

१) वरील बाबतीत कोणाच्या काही सूचना / प्रश्न असल्यास दि. १२/०७/२०२३ अखेर बँकेच्या प्रधान कार्यालयात लेखी पाठवाव्यात. वरील बाबतीत काही माहिती पाहिजे असल्यास ऑफिस वेळेत मिळेल.
२) बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी उपस्थित राहिल्याबद्दल प्रमाणपत्र सभेच्या ठिकाणी बँकेचे अधिकारी आपणास सही करून देतील. ती प्रत जपून ठेवणेची आहे. सभेस येतेवेळी आपले ओळखपत्र घेवून यावे.
३) आपल्या पत्त्यातील बदलाची नोंद बँकेकडे करावी.
४) वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या सर्व शाखांमधून दि. ०७/०७/२०२३ पासून उपलब्ध होईल. तसेच बँकेच्या www.panchgangabank.com या संकेतस्थळावर दि. ०४/०७/२०२३ पासून उपलब्ध होईल.